भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येत असलेल्या "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" या योजनेअंतर्गत देय वार्षिक भत्यात वाढ करणे तसेच पात्रतेच्या अटींमध्ये सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : स्वयंम-२०२३/प्र.क्र. ३६८/योजना-२,

नविन प्रशासकीय भवन, ३ रा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा मार्ग,

मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा:- १. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.धवगृ-२०१९/प्र.क्र. १२६/मावक, दिनांक ०६.०९.२०१९

२. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.स्वयंम-२०२३/प्र.क्र. ३६८/योजना-२, दिनांक २१.०६.२०२४

३. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.स्वयंम-२०२३/प्र.क्र. ३६८/योजना-२, दिनांक १९.०९.२०२४

४. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.स्वयंम-२०२३/प्र.क्र. ३६८/योजना-२, दिनांक ०४.११.२०२५

५. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.इमावबकसं/आधार योजना / शासन निर्णय सुधारणा/२०२६-२७/५२०७ दि.११.०९.२०२६

६. मा. मंत्रीमंडळाच्या दि.०६.१०.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

<u>प्रस्तावना :-</u>

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी आदिवासी विकास विभागाप्रमाणे धनगर समाजातील विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागू करण्यात आलेली आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत भोजन, निवास , शैक्षणिक साहित्य व

इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्याकरीता सदर योजनेंतर्गत भत्ता देण्यात येतो.

तथापि, सद्यस्थितीत वाढलेली महागाई, मोठ्या शहरांमधील निवासाचा व भोजनाचा वाढलेला खर्च आणि शैक्षणिक साहित्याचे वाढलेले दर पाहता, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहामध्ये टिकवून ठेवणे आणि त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याकरीता योजनेंतर्गत देय लाभांमध्ये वाढ करणे गरजेचे आहे.

यानुषंगाने, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महागाई निर्देशांकानुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' या योजनेअंतर्गत देय वार्षिक भत्त्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सदर बैठकीतील विषय क्रमांक १० च्या निर्णय क्र. ३ नुसार, या सर्व सुधारीत तरतूदी व वाढीव लाभांची रक्कम विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनाही लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यास अनुसरून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत देण्यात येणा-या वार्षिक भत्त्यात वाढ करणे तसेच योजनेंतर्गत पात्रतेच्या अटींमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या “पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना” या योजनेमध्ये पुढील अटींचा समावेश करण्यात येत आहे.

(१) “पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना” या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी (शहरांमध्ये) शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत, अशा जिल्ह्यांत “पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना” या योजनेचा लाभ जिल्हास्तरावरील महाविद्यालयांसाठी घ्यावयाचा असेल तर प्रथम शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी

अद्याप वसतिगृह सुरू करण्यात आले नाही. तसेच, तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्याचे धोरण नसल्यामुळे, सदर जिल्ह्यांच्या ठिकाणी व तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांस थेट पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेकरीता अर्ज करता येईल.

(२) विद्यार्थ्यांने स्वतःचा आधार क्रमांक आपल्या राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक आहे. संबंधित आधार संलग्न बँक खात्यामध्ये डीबीटीद्वारे रक्कम जमा करण्यात येईल.

(३) दहावीनंतर पदविका (DIPLOMA) अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन पदविकाचा अभ्यासक्रमास पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षात प्रवेश दिला जातो. अशा विद्यार्थ्यास पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट करताना पदविका (DIPLOMA) अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचे गुण हे ग्राह्य धरावेत.

(४) सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन उपस्थिती ७५% अनिवार्य आहे. त्यासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक संबंधित शैक्षणिक संस्थेकडून प्रत्येक तिमाहीची हजेरी प्राप्त करुन घेऊन, तिमाही संपल्यानंतर पोर्टलवर १५ दिवसाच्या आत सादर (UPLOAD) करणे आवश्यक आहे.

(५) विद्यार्थ्यांने ऑनलाइन अर्ज करताना CGPA चे टक्केवारी (PERCENTAGE) मध्ये रूपांतर करून त्याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदरहू प्रमाणपत्र अर्जासोबत सादर न केल्यास प्रस्तुत विद्यार्थी योजनेकरीता अपात्र समजण्यात येईल.

(६) ज्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (POST MATRIC) योजनेत शासनाकडून निर्वाह भत्त्याचा लाभ मिळाला आहे, त्यांना या योजनेमधून पूर्ण निर्वाह भत्ता मिळणार नाही. यासाठी सदर विद्यार्थ्याने संबंधित महाविद्यालयाकडून प्रमाणपत्र प्राप्त करून ONLINE अपलोड केल्यानंतरच विद्यार्थ्यास उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल.

(७) सदर योजनेंतर्गत परिक्षेत्राच्या सीमा व विद्यार्थ्यास परिक्षेत्रानुसार देय रक्कमेत मा.मंत्रिमंडळाच्या दि.०६.१०.२०२६ रोजीच्या बैठकीतील मान्यतेस अनुसरुन सन २०२६-२७ पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

अ.क्र.	खर्चाची बाब	मुंबई शहर, उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी	इतर महसुल विभागीय शहरातील व 'क' वर्ग महानगर पालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी	इतर जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच, महानगर पालिकेच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये/शैक्षणिक संस्था या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी	तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी
१	भोजन भत्ता	रु. ४२,०००/-	रु. ३७,०००/-	रु. ३२,०००/-	रु.३०,०००/-
२	निवास भत्ता	रु२८ .,०००-/	रु. २१,०००/-	रु. १७,०००/-	रु. ३,०००/-
३	निर्वाह भत्ता	रु. १०,०००/-	रु. १०,०००/-	रु. ८,०००/-	रु. ७,०००/-
	एकूण वार्षिक मर्यादा	रु. ८०,०००/-	रु. ६८,०००/-	रु. ५७,०००/-	रु. ५०,०००/-

उपरोक्त नमूद रक्कमेव्यतिरीक्त पात्र वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु. ८,०००/- आणि अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु. ४,०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरूपात देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(८) महानगरपालिकेच्या हद्दीपासून ५ कि. मी. परिसरात महाविद्यालय असल्याबाबतचे संबंधित महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थ्यास तालुका स्तरावर देय असलेली रक्कम अदा करण्यात येईल.

(९) एका तालुकास्तरावरील विद्यार्थ्याचा महाविद्यालयीन प्रवेश, दुसऱ्या तालुक्याच्या ठिकाणी झाल्यास महाविद्यालय व विद्यार्थ्यांचे कायम निवासाचे ठिकाण यामधील अंतर हे २० कि.मी पेक्षा जास्त असल्यास संबंधित विद्यार्थ्यास तालुकास्तरीय लाभ अनुज्ञेय राहील.

(१०) विद्यार्थ्यांस पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ ज्या ताखेपासून मंजूर झाला, त्या तारखेपासून लाभ न देता विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम ज्या तारखेपासून सुरु झाला त्या तारखेपासून विद्यार्थ्यास लाभ देण्यात यावा,

(११) सदर योजनेंतर्गत नियमित पात्र विद्यार्थ्याने नुतनीकरणाकरीता अर्ज सादर न केल्यास, सदर विद्यार्थ्यांस या योजनेच्या लाभाची गरज नाही असे समजून त्यांना देय असलेल्या योजनेचा लाभ न देता, सदरच्या जागा रिक्त समजण्यात यावी व नुतनीकरण न झालेल्या जागा अनुक्रमे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष याप्रमाणे भरल्या जातील.

(१२) १२ वी नंतर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना किमान ५०% गुणांची अट लागू राहिल. तसेच १२ वी नंतर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेले व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेत असलेले विद्यार्थ्यांचे पदवीचे गुण विचारात घेण्यात यावे. सदर गुण किमान ५०% असणे आवश्यक असेल.

(१३) ज्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीनुसार शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला आहे. परंतु, शासकीय वसतिगृहापासून विद्यार्थ्यांचे महाविद्यालय १५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर असेल आणि विद्यार्थ्याला ते गैरसोयीचे होत असेल तर अशा पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या सहमतीने नियमानुसार पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ देता येईल.

०२. सदर योजनेकरीता संदर्भीय शासन निर्णय दि.२१.०६.२०२४,दि.१९.०९.२०२४ व ०४.११.२०२६ मधील इतर अटी व शर्ती या कायम राहतील.

०३. सदरहू शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६११०६१५४२३५९५३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by NIKETAN VIJAY CHANDGUDE
Date: 2026.11.06 15:45:47 +05'30'

(निकेतन चांदगुडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२. मुंबई/नागपूर,

२) मा. मंत्री (इ.मा.ब.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

३) सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,

४) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे,

५) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे,

६) सर्व प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,

७) सर्व सहाय्यक संचालक ,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,

८) निवासी लेखा परिक्षक, मुंबई,

९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

११) निवड नस्ती (योजना-२).